# ७३ वी घटनादुरुस्ती व ग्रामसभेची भूमिका

श्री.दयानंद बजरंग इनामदार, सहाय्यक प्राध्यापक, श्रीपतराव चौगुले आर्ट्स अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली

---

**प्रस्तावना:-**

प्राचीन ग्रीक नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाही व लोक सहभागातून राज्यकारभारातील निर्णय निर्धारण प्रकिया चालत असते. प्रत्यक्ष लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला व्यक्तिगतरित्या शासकीय यंत्रणेत सहभाग घेता येतो. आज ही ग्रामपंचायत मधील ग्रामसभेच्या माध्यमातून प्रत्यक्ष लोकशाहीचे अवलंबलेली जाते. या ग्रामसभेत गावातील सर्व प्रौढ मतदाराचा गावाच्या विकासाच्या दृष्टीने कार्य करताना व निर्णय घेताना सहभाग असतो. ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्राम पंचायतीचा विस्तार झाला. विकेंद्रीकरणाने ग्रामसभेला महत्व प्राप्त झाले. यातून ग्रामसभा गावातील निर्णय घेणारी संस्था बनली.

**७३ वी घटनादुरुस्ती व ग्रामसभा**

पंचायतराजमधील सर्वात खालच्या पण महत्त्वाच्या टप्प्याला ग्रामपंचायत म्हणतात. प्रत्येक राज्यात ग्रामपंचायत स्थापनेसंबधी वेगवेगळे कायदे अस्तित्वात आले. शिवाय राज्यांनुसार त्यांची नाव व रचना बदलते. घटकराज्यांना ग्रामपंचायती स्थापन करण्याचा अधिकार असल्याने ग्रामपंचायतीच्या रचनेत व स्वरुपात भिन्नता आढळते. या ग्रामपंचायतीचा कारभार सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक ह्यांच्या मदतीने केला जातो. तसेच ग्रामपंचायतेची ग्रामसभा ही कार्यकारी समिती आहे. १९९२ साली ७३ व्या घटनादुरुस्तीने कायद्याने ग्रामपंचायतीला घटनात्मक दर्जा देऊन ग्राम पंचायत सशक्त बनवली. या घटनादुरुस्तीने वर्षातून ४ ग्रामसभा घेणे बंधनकारक बनले.

लोकसहभागतून राज्यकारभाराचे निर्णय घेतले जातात त्या पद्धतीला प्रत्यक्ष सरकार अथवा प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात. याचप्रमाणे ज्या कारभारात लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सहभागी होतात आणि राज्यकारभाराचे निर्णय घेतात त्या कारभार पद्धतीला अप्रत्यक्ष सरकार किंवा प्रतिनिधीचे सरकार असे म्हटले जाते. हीच पद्धती ग्राम पंचायतीतील ग्रामसभेत अवलंबली जाते. ग्रामसभा म्हणजे पंचायतराजांचा प्राथमिक एकक. प्रत्येक गावातील त्या गावातील प्रौढ मतदारांना एकत्र करून ही ग्राम सभा तयार केली जाते. म्हणजेच, गावात प्रत्येक मतदार ग्राम सभासद असतो.

ग्रामसभा या संकल्पनेत ग्राम आणि तिची सभा अंतर्भूत आहे.स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने ग्राम आणि ग्रामसभा याबाबत कलम २४३ अ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद केली आहे ७३ व्या राज्यघटनादुरुस्तीनुसार १९९३ साली ग्रामसभेला संवैधानिक दर्जा प्राप्त झाला. असे असले तरीही, गावसंबंधीत कामे मंजूर करण्याचा अधिकार ग्रामसभेला नसतो. पण या सभेस नैतिक अधिकार जास्त असतो. ग्रामसभेचे गावाच्या विकासात महत्त्वाचे योगदान असते. हे तळागाळातील लोकांचा आवाज स्पष्ट करण्याचे एक माध्यम आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने ग्रामसभा संदर्भामध्ये ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये काही सुधारणा करून १६ ऑक्टोबर २००२ रोजी ग्रामपंचायत 'सुधारणा अध्यादेश' काढलेला आहे. त्यामुळे ग्रामसभांना अनन्य साधारण महत्त्व दिलेले असून पूर्वीच्या चार ग्रामसभा ऐवजी एकूण सहा ग्रामसभा अनिवार्य करण्यात आलेल्या आहेत. तसेच महिलांच्या ग्रामसभा घेणेही बंधनकारक आहे. ग्रामसभांना या दुरुस्तीमुळे इतरही विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत.

ग्रामसभा हे प्रत्यक्ष कारभाराचे उदाहरण असून ग्रामपंचायतीच्या हद्दीत असणाऱ्या गावातील व वाड्यावस्त्यामधील ग्रामपंचायतीचे मतदार हे ग्रामसभेचे सदस्य असतात. ग्रामसभेत गावातल्या लोकांनी एकत्र येवून लोकांच्या गरजा काय आहेत त्या ग्रामपंचायतीला सांगाव्यात आणि गावांच्या भल्यासाठी कोणत्या योजना अग्रक्रमाने घ्याव्यात हे सुचवण्याचे कार्य करावे. ग्रामसभेला एक अध्यक्ष असतो. निवडणूक झाल्यानंतरच्या पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष व आर्थिक वर्षातील पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष हा सरपंच असतो.

**ग्रामसभेची गावाच्या विकासातील भूमिका :-** पंचायत राजव्यवस्थेमध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद ही ग्रामीण विकासाची त्रिसुत्री आहे. गाव पातळीवर ग्रामविकासात ग्रामपंचायतीची भूमिका ही अत्यंत महत्वपुर्ण असते. ग्रामसभा ही प्रत्यक्ष लोकशाहीचे प्रतिबिंब असून आज ग्रामपंचायतीच्या व्यवस्थेत ग्रामसभेला अनन्य साधारण महत्व आहे. ग्रामसभा या लोकशाही सक्षमीकरणाच्या दृष्टीने कार्य करीत असून ७६ व्या घटनादुरुस्ती नुसार ग्रामसभेला घटनात्मकदृष्ट्या अधिकार बहाल करण्यात आलेले आहेत. अशा या ग्रामसभा गावातील लोकांच्या प्रतिबिंबाचे प्रतिनिधीत्व करतात.

**१.**ग्रामसभा ही लोकांना शासन कारभारात सहभागाची संधी देते. यामुळे गावाच्या विकासातील निर्णय प्रक्रियेमध्ये गावातील सर्व लोकांचा सहभाग होतो. यातून लोकशाहीच्या विषयी लोकांच्या मनात आस्था निर्माण होते. लोकशाहीमध्ये मतदार हा राजा असतो व तो ख-या अर्थाने ग्रामसभेच्या माध्यमातून आपल्या अधिकाराचा वापर करतो. ग्रामसभेतून राज्यघटनेविषयी व

लोकशाहीच्या प्रक्रियेविषयी लोकांच्या मनात आस्था निर्माण होते व ही आस्थाच लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी महत्वाची असते.

**२.**विकेंद्रीकरणाची लोकशाही प्रक्रिया प्रत्यक्षात ग्रामसभेच्या मार्फत होते. लोकशाही व्यवस्थेतील राजकीय प्रक्रियेतील निर्णय क्षमतेमध्ये व विकासात प्रत्यक्ष मतदारांना सहभाग घेता येत नाही. पण ग्रामसभा हे एकमेव असे व्यासपीठ आहे की जेथे मतदारांना प्रत्यक्ष सहभाग घेऊन गावाच्या विकासाचा नियोजीत आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभाग घेता येतो. तसेच आपल्या अधिकाराचा वापर करुन विकासाला बाधक असणा-या गोष्टीबाबत असंमती दाखवता येते.

**३.**ग्रामसभेत गावातील सर्व मतदार हे सदस्य असून त्यांना सदस्य या नात्याने अधिकार बहाल केलेले असतात. दलित, आदिवासी, महिला व तरुणांच्या आशा, आकांक्षा, व्यथा, वेदनांना वाव देणारे, गावाचे शहाणपण, सदिच्छा व कर्तृत्व व्यक्त ग्रामसभात केले जाते. आवाजहीन लोक, दुर्बल घटक, आणि महिलावर्ग यांचा प्रामुख्याने तळागाळातील समुदायामध्ये यात समावेश केला जातो. सामाजिक, आर्थिक अशी लोकाभिमुख व्यवस्था ग्रामसभेतून प्रकट होते.

**४.** ग्रामसभेला शासनाद्वारे राबविल्या जाणा-या विविध योजनांच्या लाभार्थींची निवड करण्याचा अधिकार दिला आहे. तसेच विविध योजनांची कार्यप्रणालीचे निरिक्षण करण्याचा अधिकार असल्यामुळे ग्रामसभा ही शासकीय योजनांचा लाभ तळागळातील वंचित घटकांना पोहचविण्याचे कार्य करते.

**५.**ग्रामसभा ही ग्रामीण विकासात फक्त शासकीय कागदपत्र पाहणे, मंजुरी देणे,ठराव करणे याबाबतच नसून गावातील स्थानिक समस्या व त्यांच्याविषयीचे प्रश्न उपस्थित करुन त्याच्याबाबत साधक बाधक चर्चा करणारे व्यासपीठ आहे.

**६.**ग्रामसभेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील अनु. जाती जमातींना विकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभाग करुन घेतला जातो. व तसेच त्यांना योग्य नेत्त्वाची संधी दिली जाते.समाजातील अस्पृश्य जाती यासुध्दा ग्रामविकासाचा घटक आहे. अशी भावना निर्माण होते. ग्रामसभेतून महिला सक्षमीकरणाची ही प्रक्रिया सुरु झालेली दिसते. महिला या विकासातील महत्वपूर्ण घटक असून ग्रामसभेत त्यांच्या निर्णय प्रक्रियेला महत्व आहे . अशा प्रकारे अनु. जाती जमाती व महिलांचे नेतृत्व ग्रामसभेतून निमार्ण होते

**७.**ग्रामसभेच्या माध्यमातून लोकांचा सहभाग गावाच्या कार्यप्रणालीत होत असतो. तसेच निर्णय क्षमतेत त्यांची भूमिका ही महत्वपूर्ण असते. या पध्दतीने गावातील लोकांना राजकीय प्रक्रियेचे प्रशिक्षण अनुभवातून ग्रामसभेच्या माध्यमातून प्राप्त होते.

८.ग्रामसभा सर्व गावाचे व्यासपीठ असून संवादातून एकात्मता कायम ठेवण्याचे साधन आहे. ग्रामसभेमध्ये सर्व मतदार सारखे असतात व प्रत्येक व्यक्तीला बोलण्याचा व आपली मते मांडण्याचा अधिकार आहे. कमकुवत घटकाला गावच्या विकासाच्या मुळ प्रवाहामध्ये सामिल करून घेतल्यास खऱ्या अर्थाने गावाचा विकास साध्य करता येईल आणि या विकासाला एक विशिष्ट दिशा प्राप्त करून देते.

**समारोप :** एकंदरीत ग्रामसभा गावातील सामुदायिक कर्तव्यांचे व आशा- आकांक्षांचे प्रतिक आहे. कायद्याने जरी प्रत्यक्ष कामे मंजूर करण्याचा ग्रामसभेला अधिकार नसला तरी, तिचा नैतिक अधिकार खूप मोठा असून तिच्या विरुद्ध ग्रामपंचायतीला जाता येणार नाही. असे असले तरी ग्रामसभा यशस्वी होण्यासाठी सर्वसाधारण ग्रामस्थ विशेषतः शेतमजूर व स्त्रिया यांना सोयीचा दिवस व वेळ ग्रामसभेसाठी निवडावी,ग्रामसभेची तारीख वेळ आणि ग्रामसभेपुढील विषय यांना व्यापक पूर्व प्रसिद्धी दयावी, दवंडीद्वारे, लाउडस्पीकरवरून, ग्रामपंचायत कार्यालय व गावातील मोक्याच्या जागी मोठे ठळक फलक लाऊन प्रसिद्धी करता यावी, वर्गात ग्रामसभेची माहिती सांगून मुलांना आपल्या पालकांना सभेस पाठविण्यास प्रवृत्त करावे, ग्रामसभेपूर्वी गावातील स्वयंसेवी संस्था, अंगणवाडी सेविकेमार्फत महिलामंडळाला ग्रामसभेची माहिती देण्यात आली तर महिलांचा सहभाग ग्रामसभेत वाढेल, ग्रुप – ग्रामपंचायत असल्यास प्रत्येक गावात आळीपाळीने ग्रामसभा घेतली जावी,एरवी गावातील वेगवेगळ्या वस्त्या किंवा वाड्यांवर/पाड्यांवर आळीपाळीने ग्रामसभा घेण्यात यावी अशा पद्धतीने ग्रामसभा यशस्वी केल्या जाव्यात.

संदर्भसूची :

१.नितीन आरोटे व विजय भागात, "ग्रामसभा : प्रभावशाली शासन प्रशासन, घाट प्रकाशन,२०१७

२.हिमाशु रे प्रभा, "प्राचीन भारत, प्रकाशन विभाग सूचना आणि प्रसार मंत्रालय भारत सरकार नई दिल्ली १९९७

३.७३ व्या घटना दुरुस्ती मुळे ग्रामपंचायतीच्या कारभारातील बदल – पुस्तिका, वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट,

४.विभूते भालबा,ग्रामपंचायत प्रशासन-तोडओळख, प्रौढ आणि निरतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग कोल्हापूर,२००६

५.लोकशाहीचे बलस्थान व गावाचे व्यासपीठ : ग्रामसभा वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट, पुणे

६. महाराष्ट्र शासन,शासन निर्णय क्रमांक:व्हीपीएम-२०१७/प्र.क्र.५१२/पंरा-३ दि.२७ एप्रील२०१८

७.आरोटे नितीन व भागात विजय, "ग्रामसभा : प्रभावशाली शासन प्रशासन, घाट प्रकाशन,२०१७ पृ.क्र.१८

८..ग्राम सभा माहिती पुस्तिका २०१७-२०१८ पृ.क्र.१२-१३